Maharashtra State
Board ofSecandary & Higher Secondry Education
S.R. No. 832 A, Final Plot No. 178, 179
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 00

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनलप्लॉटनं.१७८ व १७९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.

Phone No.:- 020- 25705000 E-mail:- secretary@msbshse.ac.in Fax No.:- 020-25665807

क्र. रा.मं./संशोधन,पापुअ-ई/ १०९९
पुणे-४११ ००४
दि. ०१/०३/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे, सर्व विभाग.

विषय- इयत्ता ९वी व १०वी आणि इयत्ता ११वी व १२वी सुधारित विषय योजना व मूल्यमापन योजनेच्या अंमलबजावणीबाबत......

संदर्भ-१) शासन निर्णय क्र.संक्रीर्ण२०१९/प्र.क्र.(२४३-१९)एसडी-४, दि.०८ ऑगस्ट २०१९चे इ.९वी,१०वी आणि इ.११वी, १२वी संदर्भातील दोन शासन निर्णय.
२) बालभारती कार्यालयाचे ह-/भाषा-भाशेतर/४०२०, दि.३०/१२/२०२०,
३) बालभारती कार्यालयाचे ह-/भाषा-भाशेतर/४०२१, दि.३१/१२/२०२०,
४) SCERT, पुणे कार्यालयाचे राशैसप्रपम/अविवि/दिव्यांग मूल्यमापन योजना/२०२०-२१/०९, दि.०१/०१/२०२१,
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/पुनर्रचित अभ्यासक्रम:२०२०-२१/ दिव्यांग विद्यार्थी इ.९वी व १०वी/४८८, दि.०९/०२/२०२१,
६) SCERT, पुणे कार्यालयाचे राशैसप्रपम/अविवि/विषय योजना परिपत्रक/२०२०-२१/६२५, दि.१०/०२/२०२१,

उपरोक्त विषयांच्या संदर्भाधिन पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे. संदर्भ क्र.६ च्या दि.१०/०२/२०२१ च्या परिपत्रकान्वये इयत्तानिहाय पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (विद्याप्राधिकरण) पुणे यांच्या मार्फत खालीलप्रमाणे कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे सर्व संबंधीतांनी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करावयाची आहे. सुलभ संदर्भासाठी सदर परिपत्रकाची प्रत या पत्रासोबत देण्यात येत आहे.

१) **'जलसुरक्षा'** हा विषय **'स्व-विकास व कला रसास्वाद'** या श्रेणी विषयाऐवजी अनिवार्य श्रेणी विषय म्हणून समाविष्ट करण्यात आला आहे. सदर विषयाची अंमलबजावणी शालेय वर्ष २०२०-२१ पासून इ.९वी व शालेय वर्ष २०२१-२२ पासून इ.१०वी साठी करण्यात येत आहे.

२) **कार्यशिक्षण विषयांतर्गत येणारे ९ विषय व 'शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र'** या विषयांचे बालभारती कार्यालयामार्फत पुनर्रचित अभ्यासक्रम व त्यानुसार नवीन पाठयपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत, त्याच्या अंमलबजावणी बाबत संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे, त्यात बदल करण्यात येत असून पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शालेय वर्ष २०२०-२१ पासून इ.९वी व शालेय वर्ष २०२१-२२ पासून इ.१०वी साठी करण्यात येत आहे.

३) श्रेणी विषयातील वैकल्पिक गटात 'संरक्षणशास्त्र' या विषयाला सद्यस्थितीत 'एम.सी.सी.(इ.९वी साठी), 'स्काऊट गाईड', 'नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा', 'एन.सी.सी.' हे विषय सुरु आहेत. 'कार्यशिक्षण', 'समाजसेवा' व 'व्होकेशनल V१,V२,V३ इ.' व्यवसाय विषयांचे पर्याय शालेय वर्ष २०२०-२१ पासून इ.९वी व शालेय वर्ष २०२१-२२ पासून इ.१०वी साठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

४) 'कलेचा इतिहास व रसग्रहण' आणि 'संगीताचा इतिहास व विकास' या विषयांचे बालभारती कार्यालयामार्फत पुनर्रचित अभ्यासक्रम व त्यानुसार नवीन पाठयपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत, त्यांची अंमलबजावणी शालेय वर्ष २०२०-२१ पासून इ.११वी व शालेय वर्ष २०२१-२२ पासून इ.१२वी साठी करण्यात येत आहे.

आपल्या कार्यकक्षेतील सर्व संबंधीत माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये, संस्था यांना उपरोक्तप्रमाणे कार्यवाहीसाठी त्वरीत कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सचिव**
**राज्य मंडळ, पुणे-४**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/ 7226
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:- ०१/०३/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व क.महाविद्यालय,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**इयत्ता ९ वी व १०वी आणि इयत्ता ११वी व १२वी सुधारीत विषय योजना व मूल्यमापन योजनेच्या अंमलबजावणीबाबत** राज्य मंडळाचे क्र.रा.मं./संशोधन, पापुअ-ई/१०९९ दि. ०१/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळा प्रमुख व क.महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.